# प्रेस नोट दिनांक २१ l०९ l२०१७

## घरफोडी चो-या करणा-या सराईत गुन्हेगार स्त्रीयांकडून घरफोडी चोरीचे ०३ गुन्हे उघड

---

दिनांक १४/०९/२०१७ रोजी प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.एस.व्ही.शिंदे यांचे सुचना व मार्गदर्शना प्रमाणे घरफोडीचोरीस प्रतिबंध व्हावा म्हणून त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व कर्मचारी विश्रांतवाडी पो.स्टे.हद्दीत पेट्रोलींग करीत घरफोडी चोरीचे गुन्हेगार चेक करीत असताना पो.ना.ब.नं.१५१२ यशवंत खंदारे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत मिळाले बातमी प्रमाणे विश्रांतवाडी – धानोरी रोड, सोमेश्वर मंदिर समोर पुणे शहरात घरफोडया चो-या करणारी गुन्हेगार **श्रीमती उषा रामा कांबळे वय २७** रा. स.नं.११२/४६ पत्र्याची चाळ, भिम नगर, धानोरी रोड,विश्रांतवाडी पुणे हिस पकडून तीला प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा कार्यालय,पुणे या ठिकाणी आणून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सतीश शिंदे यांचे मार्गदर्शना खाली तपास केला असता.

आरोपी श्रीमती **उषा रामा कांबळे** हिने तिची साथीदार **सुरेखा राजु शिंदे वय ४० वर्षे** रा. स.नं.११२/४६ पत्र्याची चाळ, भिम नगर, धानोरी रोड,विश्रांतवाडी पुणे हिचेसह धानोरी परिसरात घरफोडया चो-या केल्याचे कबुल करुन तीचे माहितीने तीची साथीदार सुरेखा राजु शिंदे हिस पकडून, त्यांचेकडे अटक व पोलीस कस्टडी रिमांड मुदतीत तपास करता, त्यांनी सुमारे १ वर्षा पुर्वी, मागील वर्षी दस-याचे एक दिवस आगोदर व माहे एप्रील २०१७ मध्ये केलेल्या घरफोडया चो-या मधील **कि.रु.२,७८,०००/-** चे सोन्याचे दागिने त्यामध्ये ३ गंठण व कानातील कर्णफुले एकुण वजन १० तोळे व मोगले आझम डिझाईनचे चांदीचे पैंजण २५० ग्रॅम असा ऐवज हस्तगत करुन **(१) विश्रांतवाडी पो.स्टे.गु.र.नं. १८८/१६ भा.द.वि.क. ४५४,३८० (२) विश्रांतवाडी पो.स्टे.गु.र.नं. २००/१६ भा.द.वि.क. ४५४,३८० (३) विश्रांतवाडी पो.स्टे.गु.र.नं. ३३८/१७ भा.द.वि.क. ४५४,३८०,३४** हे घरफोडी चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदरची कार्यवाही श्री प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे., श्री पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे,पुणे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर यांचे मार्गदर्शना खाली प्रॉपर्टी सेल, गुन्हे शाखा,पुणे शहर कडील नेमणुकीस असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सतीश शिंदे, पोलीस उप निरीक्षक अेजाजखान शिलेदार, स.पो.फौ. दत्तात्रय गरुड, पो.ना. यशवंत खंदारे पो हवा., अमोल भोसले, अनिल उसुलकर, संभाजी गायकवाड यांनी केलेली आहे.